यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक – 422 222

दूरध्वनी क्रमांक – (0253) 2231714, 2231715, 2230227, 2230013 फॅक्स (0253) 2230298

जा.क्र. पनिका/परीक्षा / 08 / 2022 दिनांक : 11/01/2022

नोटिफिकेशन

विषय : फेब्रुवारी 2022 परीक्षेच्या (हिवाळी परीक्षा) अंतर्गत (Practical/Project CA & UA, वर्कबुक, इंटर्नशिप, स्टुडिओ टर्मवर्क, स्टुडिओ मौखिक, इत्यादी) गुणांबाबत...

विद्यापीठाच्या सर्व शिक्षणक्रमांच्या हिवाळी परीक्षा परीक्षा दि. 08 फेब्रुवारी 2022 पासून सुरु होत आहेत. या सर्व शिक्षणक्रमांचे Practical-CA & UA, प्रोजेक्ट-CA & UA, वर्कबुक, इंटर्नशिप, स्टुडिओ टर्मवर्क, स्टुडिओ मौखिक तत्सम गुण ऑनलाईन प्रक्रियेने भरावयाचे असतात. ऑनलाईन पद्धतीने गुण कसे भरावयाचे असतात त्याकरिता विद्यापीठाच्या पोर्टलवरील Presentation Tab मधील अ.क्र. 16 – How to do mark entry हा डेमो बघावा.

Practical-CA & UA, प्रोजेक्ट-CA & UA, वर्कबुक, इंटर्नशिप, स्टुडिओ टर्मवर्क, स्टुडिओ मौखिक तत्सम गुणांबाबत आपणास पुढीलप्रमाणे सूचित करण्यात येत आहे.

1) अभ्यासकेंद्रांनी Login ID आणि Password चा वापर करून गुण ऑनलाईन पद्धतीने भरणे बंधनकारक आहे. Login ID आणि Password मिळालेला नसल्यास विभागीय केंद्राशी संपर्क साधावा अथवा नवीन User ID, Login ID, Password काढणेसाठी डेमो क्र. 24 Create Login for Exam coordinators (for mark Entry) हा पाहून नवीन तयार करावा.
2) प्रात्यक्षिक परीक्षेच्या अभ्यासक्रमनिहाय कोऱ्या उपस्थिती याद्या व गुणदान याद्या विद्यापीठाच्या वेबसाईटवर आपल्या केंद्राच्या Login मध्ये उपलब्ध आहेत. अभ्यासकेंद्रांनी सदर याद्या User ID & Password वापरून वेबसाईटवरून डाऊनलोड करून घ्याव्यात.
3) Practical CA/UA च्या गुणदान याद्या दिनांक 18 **जानेवारी 2022 ते 18 फेब्रुवारी** 2022 पर्यंत ऑनलाईन पद्धतीने नोंदी करण्यासाठी उपलब्ध आहेत (प्रात्यक्षिक, मौखिक, स्टुडिओ वर्क यासारख्या परीक्षा COVID-19 च्या परिस्थितीमुळे झूम, गुगलमिट, स्काईप, इत्यादी माध्यमांतून ऑनलाईन पद्धतीने आयोजित कराव्यात) त्याप्रमाणे **नोंदी करून डाटा Publish करावा.**
4) ऑनलाईन पद्धतीने गुण भरल्यानंतर आणि मार्क्स Successfully upload केल्यानंतर ती यादी सही व शिक्क्यानिशी सिलबंद करून विद्यापीठ मुख्यालयात परीक्षा कक्षाकडे माहितीसाठी पोस्टाद्वारे पाठविण्यात यावी. Excel मध्ये यादी तयार करून त्यामध्ये गुणांची नोंद करून ती यादी पाठवू नये. अशा यादीमध्ये नोंदविलेल्या गुणांची दखल घेतली जाणार नाही याची याची अभ्यासकेंद्राने नोंद घ्यावी.

5) निकाल वेळेत जाहीर करण्याकरिता दिलेल्या मुदतीत ऑनलाईन पद्धतीने गुण भरलेले नसल्यास Absent Mark करून निकाल जाहीर केला जाईल. विद्यार्थ्याच्या निकालात गैरहजर आल्यास सर्वस्वी अभ्यासकेंद्र जबाबदार असेल. विद्यार्थ्याच्या याबाबतच्या येणाऱ्या तक्रारी विद्यापीठाकडे प्राप्त झाल्यास त्यास संबंधित अभ्यासकेंद्रांना उत्तर देणे बंधनकारक राहील व सदरचे तक्रार अर्ज संबंधित अभ्यासकेंद्राकडे कार्यवाहीसाठी पाठविण्यात येतील, याची अभ्यासकेंद्रांनी कृपया नोंद घ्यावी. ऑनलाईन लिंक बंद झाल्यानंतर कोणत्याही कारणास्तव गुणांकरिता लिंक सुरु केली जाणार नाही याचीही अभ्यासकेंद्रांनी नोंद घ्यावी.

6) ऑनलाईन पद्धतीने गुण भरण्यास काही अडचण येत असल्यास प्रथम विद्यापीठ पोर्टल (ycmou.digitaluniversity.ac) येथे Presentation मध्ये जाऊन संबंधित Presentation पाहून त्यानुसार कार्यवाही करावी.

7) विद्यार्थ्यांच्या अंतर्गत परीक्षा कोविड-19 संबंधी आपापल्या जिल्ह्यातील जिल्हाधिकाऱ्यांनी जाहिर केलेल्या कोविड संबंधीच्या नियमावलीचे पालन करून सोशल डिस्टंसिंग, मास्क व अन्य खबरदारी घेऊनच घेण्यात याव्यात.

8) ज्या विद्यार्थ्यांचे नाव/ सीट नंबर विद्यापीठाकडून उपलब्ध झालेल्या कोऱ्या गुणदान याद्यांमधे नसेल परंतू विद्यार्थी परीक्षेस उपस्थित असेल व परीक्षा देण्यास पात्र असेल तर अशा विद्यार्थ्यांचे गुण सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात (परिशिष्ट मध्ये) पाठविण्यात यावेत. त्याप्रमाणे विहित नमुन्यात आणि विहीत मुदतीत प्राप्त झालेलेच गुण स्विकारले जातील याची नोंद घ्यावी. तसेच सदर गुण हे फक्त परीक्षेकरीता पात्र विद्यार्थ्यांचेत सादर करावेत.

9) वरील पद्धतीने गुण भरल्यानंतर ती यादी सही व शिक्क्यानिशी सिलबंद करून विद्यापीठ मुख्यालयात परीक्षा कक्षाकडे माहितीसाठी पोस्टाद्वारे पाठविण्यात यावी.

परीक्षा नियंत्रक

प्रती –

1) सर्व विभागीय केंद्रे – यचममुवि
   कृपया आपल्या अधिनस्त सर्व अभ्यासकेंद्रांना ईमेल, Whatts App Group, टपालाने या सूचना कळवाव्या.
2) सर्व विद्याशाखा संचालक
3) श्री. प्रेमनाथ सोनवणे, डेटा सुपरवाईजर – वेबसाईटवर प्रसिद्धीसाठी
4) मा. कुलगुरू कार्यालय,
5) मा. कुलसचिव कार्यालय

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

ज्ञानगंगा घरोघरी

मॅन्युअल गुण पाठविण्याचा नमुना (परिशिष्ट)

CA/UA marks for the examination for February 2022

Name of Study Center: Study Center Code :

Name of Program : Pattern of Program :

Name of Subject : Code of Subject :

Sr. No.	Seat No.	PRN	Name of Student	CA Out of	UA Out of

Study Center's Explaination :

Sign of Internal Examiner
(Name)

Sign of External Examiner
(Name)

Seal of study center.